# प्रसिद्धी विभाग

## २०१३ – २०१४

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

प्रभात पुणे
शनिवार, दि. १ फेब्रुवारी २०१४ | जिल्हा विशेष | ३

# साहेबराव बुट्टे पाटील व्याख्यानमालेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## विविध मान्यवरांच्या व्याख्यानांची मेजवानी



राजगुरुनगर : येथे कै. साहेबराव बुट्टे पाटील व्याख्यानमालेस श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

■ राजगुरुनगर, दि. ३० (वार्ताहर) - येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. ॲड. साहेबरावजी बुट्टे पाटील यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आयोजित व्याख्यानमालेस विद्यार्थ्यांसह आबालवृद्धांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले. व्याख्यानमालेचे यंदा १३ वे वर्ष आहे.

या व्याख्यानमालेचे उद्घाटन कै. बुट्टे पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र साहेबराव बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, व्याख्यानमाला समितीचे प्रमुख अनिल कुलकर्णी, प्रकाश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते

या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प थोर विचारवंत प्रकाश पाठक यांचे 'मुकी होत चाललेली घरे..' दुसरे पुष्प, ज्येष्ठ पत्रकार राजीव खांडेकर यांचे राष्ट्रनिर्मितीत युवकांचे भान, राशीचक्रचे शरद उपाध्ये यांचे फलज्योतिषातील गमती-जमती, पं. हृदयनाथ मंगेशकर यांचे एक मनोगत, रामदास महाराज कैकाडी यांचे अध्यात्म आणि विज्ञान यांनी गुंफले.

पहिल्या पुष्पा दरम्यान पाठक म्हणाले की, आई-वडील तुमचे विद्यापीठ आहे. आजी-आजोबा विश्व विद्यापीठ आहे. शिकून जगाच्या पाठीवर कोठेही गेले तरी विद्यापीठास विसरू नका. आधुनिक काळात परिवारातील नाती सांभाळणे अत्यंत आवश्यक आहे. जर नाती सांभाळणे जमले नाही तर घरे मुकी होतात.

दुसरे पुष्प दरम्यान खांडेकर म्हणाले की, आज आदिवासी विभागात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या आहे. त्यासाठी त्यांना वणवण भटकावे लागते. या विभागात पाणी आणण्यासाठी पुरुषांनी दोन विवाह केले आहेत. जर मुंबईला पाणी व्यवस्थितरित्या देऊ शकतो मग आदिवासींना पाणी का मिळू नये? यासाठी तरुणांनी प्रयत्न केले पाहिजे. आज तरुण मुले प्रकर्षाने मोबाईल आणि इंटरनेटवर आपला वेळ व आयुष्य वाया घालवतात. तरुणांनी व विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांचे विचार अभ्यासले पाहिजे. विवेकानंदांची युवकांविषयी काय भूमिका आहे त्याचा अभ्यास करावा. त्यांचे विचार जर प्रत्येक युवकाने अंगिकारले तर भारत नक्कीच महासत्ता होण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

तिसरे पुष्प दरम्यान शरद उपाध्ये म्हणाले की, ज्योतिष म्हणजे चमत्कार नाही. त्याला आध्यात्मिक जोड आहे. तुमची कुंडली तुमचे पूर्व कर्म दाखवू शकते. मात्र, लक्षात ठेवा की शक्यतो कधीही ज्योतिषाकडे जाऊ नका, कारण तुम्हाला विनाकरण मनस्ताप होणार आहे. माणसासारखे वागा तरच माणूसपणा जाणवेल. ज्योतिषातील गंमती जमती म्हणजे भविष्य नाही फक्त परिस्थितीमुळे विनोद घडतात.

चौथे पुष्प दरम्यान मंगेशकर म्हणाले की, मी कधी भाषण केले नाही. मी वक्ता पण नाही; पण केवळ संगीत व गितांच्या आवडीमुळे मी व्याख्यानमालेत विषय दिला नाही. ज्यावेळेस जे सुचेल तेच मी बोलतो. अनुभवातूनच माणूस शिकत असतो, असेही मंगेशकर यांनी सांगितले. शेवटी सुरेल आवाजात मंगेशकर यांनी अभंग सादर केले. यावेळी सारा श्रोतावर्ग भक्तिरसात तल्लीन झाला होता.

पाचवे पुष्प दरम्यान कैकाडी महाराज म्हणाले की, देहू, आळंदी, पंढरपूर ही संतांची भूमी आहे, याचप्रमाणे देशांच्या स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान करणाऱ्या महान क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरि राजगुरु यांची जन्मभूमी आहे. विज्ञान म्हणजे निव्वळ चिकित्सा आहे. हा केवळ एक प्रयोग आहे. जे प्रयोगाने सिद्ध होते ते विज्ञान आहे. ते विज्ञान हे खरे पण विज्ञानाने आजवर जेवढे फायदे झाले तेवढे तोटे पण झाले आहेत. विज्ञानाने प्रयोग यशस्वी होणार असेल तर ते नक्कीच स्वीकारले पाहिजे. प्रयोगासाठी साहित्य लागते. आणि अध्यात्मिक प्रयोगासाठी शरीर लागते. आणि शरीरानेच आध्यात्म सिद्ध होते, अन्यथा ते शक्य नाही. तुमचा वेळ व्यर्थ घालवू नका, आजच्या काळात आस्तिक व नास्तिक काय आहे हे तुम्हीच ठरवा.

या व्याख्यानमालेचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, सचिव ॲड. राम कांडगे, प्रा. एस. बी. पाटील, उपप्राचार्या छाया खेडकर, कोंडिबा टाकळकर व संचालक मंडळाने केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख